T.P. Construction Permission
P.No 21 to 21/22 to 39

वाचले :-

१. योगेश्वर बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री.किशोर पितांबर पाटील व अण्णा धोंडीराम नागणे, तसेच सुनिल कडू पाटील, ऋषिकेश प्रमोद ललवाणी रा.पाचोरा ता.पाचोरा जि.जळगांव यांचा दि.२२/१२/२०१६ चा अर्ज.
२. म.जिल्हाधिकारी जळगांव यांचे आदेश क्रं.जमीन/१०८५/१०२६६/९४७ दिनांक.२५/०५/१९८७.
३. या कार्यालयाचे बिनशेती आगेश क्र/जमिन/बिनशेती/एसआर/१४/२०१५ दि.२३/०२/२०१६
४. सहाय्यक संचालक नगर रचना, जळगांव यांचे पत्र क्र/बांध.पर./मौजे जारगांव ता.पाचोरा/गट नं.११५/ भू.क्र.२२ ते ३९/ससं-जळ/२५६ दि.०२/०२/२०१७

------------------------------ooo------------------------------

क्रमांक/जमीन/बांधप/कावि/ ०१ /२०१७
उपविभागीय अधिकारी पाचोरा भाग यांचे
कार्यालय, पाचोरा दिनांक :१०/०३/२०१७

आदेश :

योगेश्वर बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री.किशोर पितांबर पाटील व अण्णा धोंडीराम नागणे, तसेच सुनिल कडू पाटील, ऋषिकेश प्रमोद ललवाणी रा.पाचोरा ता. पाचोरा जि.जळगांव यांनी मौजे जारगांव ता.पाचोरा येथील भूखंड क्र. १२ ते २१ व ४० ते ४९ (एकूण क्षेत्र १६३४.८५ चौ.मी) व भूखंड क्र.२२ ते ३९ (एकूण क्षेत्र १४३९.१८ चौ.मी) या क्षेत्रावर रहिवास प्रयोजनार्थ बांधकाम परवानगी व मंजुरी मिळणेंस विंनती केली आहे.

सदर अर्जाची चौकशी केली असता खालील गोष्टी निष्पन्न झालेल्या आहेत.

१. इमारत बांधकाम परवानगी मागणी केलेल्या क्षेत्रास बिनशेती परवानगी प्राप्त झालेली आहे. तसेच अर्जदार यांनी सदर क्षेत्र मोजणीसाठी मोजणी फी भरलेली आहे.
२. इमारत बांधकाम परवानगी मागणी केलेल्या क्षेत्राच्या अभिन्यासानुसार सहाय्यक संचालक नगर रचना जळगांव यांनी त्यांचे पत्र /बांध.पर./मौजे जारगांव ता.पाचोरा/गट नं.११५/ भू.क्र.२२ ते ३९/ससं-जळ/२५६ दि.०२/०२/२०१७ अन्वये मंजुरीस शिफारस केलेली आहे.
३. उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय दि.१७/०६/२०१० नुसार बांधकाम क्षेत्रावर १ % उपकर म्हणून र.रू.२,४४,२६५/- अर्जदार यांचेकडूल वसुल करण्यात आलेला आहे.

उपरोक्त निष्पन्न झालेल्या बाबीवरुन, मी उपविभागीय अधिकारी, पाचोरा भाग, पाचोरा उपोद्घातात अनुक्रमांक दोन अन्वये प्रदान केलेल्या अधिकारान्वये खालील शर्ती व अटींवर बांधकाम परवानगी देत आहे.

अटी व शर्ती :

१. इमारत बांधकामामुळे अगर त्यांच्या साहित्यामुळे सार्वजनिक रहदारीस अडथळा ची अडचण निर्माण करता कामा नये.
२. बांधकाम पूर्णत्वाचा दाखला व भोगवटा प्रमाणपत्र घेतल्याशिवाय सदरहू बांधकामाचा प्रस्तावित वापर सुरू होणार नाही याची दक्षता अर्जदार यांनी घ्यावी.
३. इमारत आरंभ परवानगी बाबतचे सदरचे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासुन एक वर्षाच्या कालवधीसाठी परिणामकारक राहील. एक वर्षाचे कालावधी नंतर सदरचे आदेश निष्कषीत होतील.

४. बांधकाम नकाशात दर्शविलेली भूखंडाची मापे जागेवर जुळली पाहीजेत. तसेच समोरून (रस्त्यापासून) बाजूने व मागील बाजूने (पाठीमागून) सोडावयाचे समास अंतर सदर नकाशात दर्शविल्याप्रमाणे जागेवर सोडली पाहीजेत.

५. जागेवर जोत्यापर्यन्तचे बांधकाम झाल्यावर सदरहू बांधकाम हे मंजूर केलेल्या बांधकाम नकाश्याप्रमाणे असल्याबाबत खात्री करून घेतल्यावरच अर्जदारास पुढील बांधकाम करू देण्यात यावे.

६. इमारत बांधकाम परवानगी मंजुर करण्यात आलेल्या क्षेत्राचे रस्ता व गटारीचे बांधकाम स्वखर्चाने करावे व न.पा./ग्रा.प. हद्दीत बांधकाम क्षेत्राचा समावेश झाल्यास संबंधीत न.पा./ग्रा.पस हस्तांतर करावे.

७. इमारतीचा वा इमारतीचे भागाचा उपयोग पूर्णत्वांचे प्रमाणपत्र सक्षम अधिका-याकडुन घेतल्याशिवाय करु नये.

८. पुर्णत्वाचे प्रमाणपत्रासाठी अर्ज करतांना त्यासोबत इमारत बांधणी रचना स्थैर्य स्थिरता शास्वती प्रमाणपत्र अर्किटेक्ट इंजिनियर यांचे प्रमाणपत्र जोडावे.

९. इमारत बांधाकाम सुरु केल्याबाबत व संपल्याबाबत संबंधीत तहसिलदार यांना कळवावे.

१०. परवानगी देण्यात आलेल्या क्षेत्राची आखणी योग्य त्या सक्षम अधिका-याकडुन करुन घ्यावी व प्रस्तावित बांधकाम हे भारतीय मानकब्युरोने विहित केलेल्या तरतुदीनुसार सक्षम स्थापत्य अभियंत्यांच्या देखरेखीखाली करणे आवश्यक आहे.

११. भूकंप विरोधक व्यवस्था अर्जदार यांनी करणे बंधनकारक आहे.

१२. छतावर पडणारे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याची अथवा साठविण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

१३. सदरहू भूखंडात कमीत कमी चार झाडे लावून जोपासली पाहीजे.

१४. विषयाधीन जागेच्या चतु:सिमेबाबत, क्षेत्राबाबत अथवा कोणताही वाद उत्पन्न झाल्यास त्याची बांधकाम परवानगी सुधारीत करून घेण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.

स्वाक्षरीत/-
(मनिषा खत्री)
उपविभागीय अधिकारी
पाचोरा भाग पाचोरा

प्रत :योगेश्वर बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री.किशोर पितांबर पाटील व अण्णा धोंडीराम नागणे, तसेच सुनिल कडू पाटील, ऋषिकेश प्रमोद ललवाणी रा.पाचोरा ता. पाचोरा जि.जळगांव यांस मंजुर बिल्डींग प्लॅन सह.

प्रत : तहसिलदार पाचोरा यांचेकडेस माहितीसाठी.

SUB-DIVISIONAL OFFICER
उपविभागीय अधिकारी
पाचोरा भाग पाचोरा
PACHORA DIV.DIST.JALGAON

Manisha

(मनिषा खत्री)
उपविभागीय अधिकारी
पाचोरा भाग पाचोरा